सकाळ




कोल्हापूर : श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, विजयराव बोंद्रे, डॉ. डी. आर. मोरे, स्कॉट कफोरा, डॉ. प्रवीण सप्तर्षी आदी.

# शेतीत ज्ञानाचे सिंचन गरजेचे

## कुलगुरू शिंदे : 'शहाजी'मध्ये शेती विकासावर चर्चासत्र

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १६ : 'शेती व्यवसायाचा विकास करायचा असेल तर त्यात ज्ञानाचे सिंचन होणे गरजेचे आहे. मानवाचा विकास शेती व्यवसायामुळेच झाला आहे. सध्या स्थानिक शेतीमध्ये शाश्वत शेती गरजेची बनली आहे', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात नुकतेच 'शेती आणि ग्रामीण विकास : क्षेत्रीय समस्या, आव्हाने आणि दृष्टिकोन' यावर आंतरराष्ट्रीय चर्चासत्र झाले. मानद सचिव विजयसिंह बोंद्रे अध्यक्षस्थानी होते.

शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, डॉ. प्रवीण सप्तर्षी, 'गोकुळ'चे अध्यक्ष विश्वास पाटील, अमेरिकेतील स्कॉट कफोरा यांचे मनोगत झाले. ई-जर्नलचे प्रकाशन झाले. भित्तिपत्रकाचे प्रकाशन झाले. 'गोकुळ'च्या विविध उत्पादनांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी स्वागत केले. प्रा. आर. एम. कांबळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. डी. एल. काशीद-पाटील यांनी आभार मानले. अध्यक्ष मानसिंग बोंद्रे, बाळासाहेब खाडे, उदय पाटील (सडोलीकर), सत्यजित पाटील, बी. एन. गोफणे, डॉ. एस. एस. पन्हाळकर, प्रा. डॉ. प्रबीर कुमार रथ, प्राचार्य डॉ. ए. एस. जाधव आदी उपस्थित होते.

Kolhapur, Kolhapur-Today
17/12/2018 Page No. 7

पुढारी

# गावांचा विकास झाल्यास शेतीचे प्रश्न सुटतील

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : शहाजी छत्रपती महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मानवाचा विकास शेतीमुळेच झाला आहे. गावात विकासाचे आनंदी वातावरण तयार झाले तर शेतीचे अनेक प्रश्न सुटतील, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शहाजी छत्रपती महाविद्यालयात 'शेती आणि ग्रामीण विकास : क्षेत्रीय समस्या, आव्हाने आणि दृष्टिकोन' या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे मानद सचिव विजयसिंह बोंद्रे होते. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, वातावरणातील बदलामुळे पिकांच्या उत्पादन क्षमतेत घट होत आहे. त्यासाठी शेतकऱ्याने शेतीत विविध प्रयोग करत उत्पादन वाढविले पाहिजे. शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे म्हणाले, शिक्षणाबरोबर शेतीचाही विकास होणे गरजेचे आहे.



**कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, विजय बोंद्रे, डॉ. डी. आर. मोरे, स्कॉट कफोरा, डॉ. प्रवीण सप्तर्षी आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

बीजभाषक डॉ. प्रवीण सप्तर्षी म्हणाले, सध्या ग्रामीण विकास होऊ नये यासाठी एक यंत्रणा कार्यरत असल्याने शेतकऱ्याने घेतलेल्या उत्पादनाला योग्य हमीभाव मिळत नाही. गोकुळचे चेअरमन विश्वास पाटील म्हणाले, गोकुळ दूध क्रांतीमुळे जिल्ह्यात एकही आत्महत्या झाली नाही. ग्रामीण विकासात गोकुळचेही योगदान महत्वाचे आहे.

स्कॉट कफोरा यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी ई-जर्नलचे प्रकाशन झाले. स्वागत प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी केले, प्रास्ताविक प्रा. आर. एम. कांबळे यांनी केले. डॉ. डी. एल. काशीद यांनी आभारमानले. यावेळी संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, बाळासाहेब खाडे, उदय पाटील, सत्यजित पाटील, बी. एन. गोफणे, डॉ. एस. एस. पन्हाळकर, प्रा. डॉ. प्रबीर कुमार रथ आदी उपस्थित होते.

लोकमत

# भारतीय अभ्यासक्रमात गुणात्मक वाढ नाहीच

## डी. आर. मोरे : वारणानगरमध्ये कोरे अभियांत्रिकी महाविद्यालयात राष्ट्रीय परिसंवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**वारणानगर :** भारतीय अभ्यासक्रमात मागच्या दशकात संख्यात्मक वाढ झाली पण आवश्यक असलेली शैक्षणिक गुणवत्ता व प्रगती साध्य करता आली नाही, असे मत शिवाजी विद्यापीठाचे माजी बी.सी.यु.डी. संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी येथे बोलताना व्यक्त केले.

नॅक, बंगलोर पुरस्कृत, तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकी महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'डिझाईन अ‍ॅन्ड डेव्हलपमेंट ऑफ करिक्युलम टू एनहान्स ड क्वॉलिटी ऑफ आउटकम बेस्ड एज्युकेशन' या



**तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय परिसंवादात डॉ. डी. आर. मोरे यांनी मार्गदर्शन केले. व्यासपीठावर डॉ. वासंती रासम, डॉ. एस. व्ही. आणेकर, माधुरी बापट, प्रा. जी. एस. कांबळे, आदी उपस्थित होते.**

दोनदिवसीय राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

परिसंवादासाठी महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील २६ कॉलेजमधून ८० हून अधिक प्राध्यापक सहभागी झाले होते.

प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम यांनी, आउटकम बेस्ड एज्युकेशन ही प्रणाली कला व वाणिज्य या शाखांमध्येही ...

होण्याची गरज व्यक्त केली.

प्राचार्य डॉ. एस. व्ही. आणेकर 'आउटकम बेस्ड एज्युकेशन'चा अर्थ व निकड स्पष्ट केली, तसेच 'नॅक'चे नवीन मूल्यांकन पद्धती ही याच धर्तीवर असल्याचे नमूद केले.

पहिल्या सत्रात अरिझोना कॉलेज, थाचेर, अमेरिकेच्या माधुरी बापट यांनी भारतीय व अमेरिकन शैक्षणिक पद्धतीचा तुलनात्मक आढावा घेतला. या दोनदिवसीय चर्चासत्रात विविध विषयांवर डॉ. एस. सुब्बारामन, प्रा. अनिल कावडे, डॉ. व्ही. व्ही. कार्जिनी, डॉ. चंद्रकांत जाधव, डॉ. आर. के. कामत व डॉ. व्ही. आर. नाईक या तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

लोकमत

# वैज्ञानिकांच्या चरित्रातून जगण्याची प्रेरणा

## व्ही. एन. शिंदे : न्यू कॉलेजमध्ये वैज्ञानिकाचे विश्व कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** वैज्ञानिकांच्या चरित्रातून जीवन जगण्याची प्रेरणा मिळते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी बुधवारी येथे केले.

येथील न्यू कॉलेजतर्फे आयोजित विज्ञान प्रबोधिनीअंतर्गत आयोजित 'वैज्ञानिकाचे विश्व' या विषयावरील कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन डी. बी. पाटील होते. डॉ. शिंदे म्हणाले, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही प्रामाणिक प्रयत्न, सचोटी व



कोल्हापुरात बुधवारी न्यू कॉलेजमधील कार्यक्रमात डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी एस. एन. इनामदार, डी. बी. पाटील, व्ही. एम. पाटील, टी. के. सरगर, के. बी. कोळी उपस्थित होते.

आत्मविश्वास या जोरावर वैज्ञानिकांनी संशोधन करून विविध शोध लावून समाजाचे कल्याण केले.

त्यातून स्वत:चे आणि देशाचे नाव अजरामर केले. संशोधन कार्याचे औपचारिक शिक्षण नसतानाही मायकेल फॅरेडे, ओहम, टेसला या शास्त्रज्ञांनी अपार कष्ट करून प्रसंगी अपमानही सहन करून यशाला गवसणी घातली.

डी. बी. पाटील म्हणाले, वैज्ञानिक दृष्टिकोनातून श्रद्धा व अंधश्रद्धा तपासून जीवन जगले पाहिजे. या कार्यक्रमास पर्यवेक्षक प्रा. एस. एन. इनामदार, विज्ञान प्रबोधिनी प्रमुख डॉ. के. बी. कोळी, आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सर्जेराव शेटके, आर. के. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य टी. के. सरगर यांनी आभार मानले.

# कोल्हापूरचे वैभव पाहून परराज्यी विद्यार्थी भारावले

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय कार्यालय, युवा आणि खेल मंत्रालय, भारत सरकार व शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय एकात्मता शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांना विविध ठिकाणांची सफर घडवण्यात आली. कोल्हापूरचे हे वैभव पाहून देशभरातून आलेले विद्यार्थी भारावून गेले.

शनिवारपासून सुरू झालेल्या या शिबिरामध्ये महाराष्ट्रसह कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, गुजरात, तामिळनाडू, पदुच्चेरी, केरळ, राजस्थान, आसाम, गोवा या विविध राज्यांतील २१० शिबिरार्थी, संघ व्यवस्थापक सहभागी झाले होते. शिबिराच्या दुसऱ्या दिवशी रविवारी सकाळच्या सत्रामध्ये सहभागी शिबिरार्थींना शिवाजी विद्यापीठाचे पन्हाळा किल्ल्यानजीकच्या असणाऱ्या स्पेस सेंटरची माहिती देण्यात आली. त्यानंतर कोल्हापूरच्या इतिहासातील महत्त्वाचा घटक असणाऱ्या पन्हाळगडाची माहितीही देण्यात आली. दुपार सत्रामध्ये न्यू पॅलेस म्युझियमची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली, तर सायंकाळी विद्यापीठामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला.

मंगळवारपासून संस्कृती संवर्धनास अनुसरून सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे एकात्मभाव वृद्धी, तज्ज्ञ मान्यवरांची व्याख्याने व मार्गदर्शन तसेच शिबिरार्थींसाठी वादविवाद, लघुनाटिका, देशभक्तिपर गीत, रांगोळी, छायाचित्रण व विविध कलाकृतींच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

पुढारी

# कोल्हापूरच्या ऐतिहासिक ठेव्याचे केले कौतुक!

## राष्ट्रीय एकात्मिक शिबिरातील विद्यार्थ्यांची भवानी मंडप, अंबाबाई मंदिर, रंकाळा परिसराला भेट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राष्ट्रीय एकात्मिक शिबिरासाठी शिवाजी विद्यापीठात देशभरातून आलेल्या विद्यार्थ्यांनी रविवारी पन्हाळगड, भवानी मंडप, श्री अंबाबाई मंदिर व रंकाळा तलाव आदी परिसराला भेट दिली. यावेळी कोल्हापूरच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक व प्राचीन ठेव्यांची विद्यार्थ्यांनी सखोल माहिती घेतली. ऐतिहासिक वास्तू व स्थळे पाहून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यांवर कौतुकाचे भाव दिसत होते.

राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय कार्यालय, युवा आणि खेल मंत्रालय, भारत सरकार व शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने शनिवारपासून (दि. १५) राष्ट्रीय एकात्मिक शिबिर सुरू आहे. या शिबिरासाठी देशभरातील विविध विद्यापीठांतून २१० विद्यार्थी आले आहेत. या विद्यार्थ्यांसाठी दररोज विविध उपक्रम राबवले जात आहेत. या उपक्रमांतर्गत रविवारी सकाळी विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक पन्हाळगडाला भेट दिली. यावेळी तीन दरवाजा, पुसाटी बुरूज आदी ऐतिहासिक वास्तूंची पाहणी करत विद्यार्थ्यांनी याबाबतचा सविस्तर इतिहास जाणून घेतला.

पन्हाळा-पावनखिंडीची शौर्यगाथा यावेळी इतिहास विषयाच्या विद्यार्थ्यांनी शिबिरार्थींना सांगितली. यासह वीर शिवा काशीद, नरवीर बाजीप्रभू देशपांडे यांचा पराक्रमही विद्यार्थ्यांनी जाणून घेतला. यानंतर रंकाळा तलाव, महाद्वार रोड, भवानी मंडप, श्री अंबाबाई मंदिर आदी ठिकाणी विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या. या वास्तूंचे वैभव पाहून विद्यार्थ्यांनी याची माहिती घेतली.

दरम्यान, सोमवारी (दि. १७) वादविवाद स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.